International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 5, pp: 880-882 www.ijaem.net ISSN: 2395-5252

# औरंगाबाद शहरातील इयत्ता नववीच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लिहिताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

Amrapali Ashok Pagare, Dr. Suhas Pathak Sir
*Research Scholar Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad*
*Assistant Professor,Department of Education , Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad*
*Corresponding author: Amrapali Ashok Pagare*

Date of Submission: 30-08-2020 Date of Acceptance: 12-09-2020

**प्रस्तावना**

इतर पशूंच्या तुलनेत मानवाला मिळालेली नैसर्गिक देणगी म्हणजे त्याची बुद्धिमत्ता. मानवाने आपल्या बुद्धी मतेच्या जोरावर प्रतिश्रुष्टी निर्माण करण्याच्या प्रयत्न चालवले आहेत ते सर्व शिक्षणामुळे साध्य झाले आहे .शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचा समतोल विकास साधला जातो. आजच्या युगात शिक्षण हे फार महत्वाचे मानलें जाते. आज जागतिकीकरनाच्या वाढत्या गरजामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. आज इंग्रजी माध्यमाकडे पालकाचा व विद्यार्थ्यांचा कल दिसून येत आहे. इंग्रजी माध्यम असल्यामुळे विद्यार्थ्यांची मातृभाषा व बोलीभाशेत गोंधळ दिसून येत आहे . शाळेत इंग्रजी भाषेतून शिकवले जाते म्हणून विद्यार्थ्यांना हिंदी भाषेविषयी अनेक समस्या जाणवतात म्हणून औरंगाबाद शहरातील विद्यार्थ्यांना हिंदी निबिध लेखनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्याचे ठरविले व इंग्रजी माध्यम असलेल्या विद्यार्थ्यां मार्फत प्रश्नावली (भरली) घेण्यात आलीव त्या आधारे माहिती प्राप्त केली.

**संशोधन उद्दिष्टे**

- ✓ इंग्लिश माध्यमाच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषेत येणाऱ्या समस्यांचा शोध घेणें.
- ✓ इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लिहीताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
- ✓ इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लिहिताना येणाऱ्या अडचणीवर उपाय योजना सुचविणे.

➢ **संशोधनांचे महत्व**

सध्या आधुनिकीकरण झपाट्याने चालू आहे प्रत्येक देशांच्या भविष्यकाळ व देशाचे अस्तित्व हे प्रामुख्याने त्या देशाच्या सुयोग्य शिक्षण पद्धतीवर अवलंबून असते.

आज इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा व विध्यार्थ्यांचा कल दिसून येत आहे मुलगा इंग्रजी शिकला या भावनेने सतुष्ट होणारा पालकवर्ग मराठी व हिंदीच्या भविष्याकडे लक्ष देणार आहे काय?इंग्रजी व हिंदी शिकवताना हिंदी कडे दूर्लक्ष होत आहे शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचे भाषिक आणि लेखन कौशल्य विकास तसेच एखादया विषयाचा अभ्यास आणि आकलन समजून घेण्याचा दृष्टीने निबिध लेखनाचे कौशल्य अवगत करून घेणे महत्वाचे मानलें जाते औपचारिक शिक्षण पद्धती त निबंध हे एक महत्त्वाचे साधन बनले माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षनात भाषेचे आकलन व प्रभुत्व निबिधाचा उपयोग केला जातो अभ्यासाधिष्टीत निबिनधामुळे विद्यार्थ्यांना त्याची विचारप्रक्रिया त्यांना पद्धतशीर पणे मांडता येते का पाहिले जाते . तसेच त्यांचा बौद्धीक क्षमतेचीही कल्पना पाहणे महत्वाचे मानले जाते परंतु , आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हिंदी विषयाकडे होणारे दूर्लक्ष व त्यामुळे विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लेखनात येणाऱ्या अडचणी जाणून घेण्यासाठी या समस्येची निवड केली व त्यावर उपाय योजना करणे गरजेचे वाटले.

➢ **सशोधन कार्यात्मक व्याख्या**

**इंग्रजी माध्यम**

ज्या शाळेत मराठी हिंदी संस्कृत या विषयांखेरिज सर्व विषय इंग्रजी भाषेतुंन शिकवलेले जातात तसेच शाळां ना इंग्रजी माध्यमाना शाळां म्हणून मान्यता आहे, अशा शाळां ना "**इंग्रजी माध्यमच्या शाळां**" असे सम्बोधले आहे.

**माध्यमिक शाळां**

1976 च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार 2वर्षाचे माध्यमिक शिक्षण (९वी10 वी )या ईयत्तेला माध्यमिक स्तर असे म्हणतात.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हिंदी निबिंध लेखनात येणाऱ्या अडचणी या अर्थाने समस्या हा शब्द वापरला आहे.

➢ **संशोधनाची कार्यपद्धति**

संशोधनात सर्वे व विश्लेषणात्मक पद्धतिचा वापर करण्यात आला आहे तसेच माहिती संकलनसाठी दुय्यम स्रोताचा उपयोग केला, त्यात पुस्तके, लेख, रिसर्च पेपर, जर्नल ईत्त्यादि चा समावेश करण्यात आला.

➢ **संबधीत साहित्याचा आढावा**

1) "मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमच्या माध्यमिक शाळांमधे शिकवल्या जाणाऱ्या मराठी भाषेच्या अध्ययन अध्यापनामधे येणाऱ्या समस्याचा चिकितस्क अभ्यास."

गोसावी अपर्णा अरविंद ,एम. फील .शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर1997

2) "मराठी भाषिक विद्यार्थ्यांना हिंदी द्वितिय भाषा विषय म्हणून अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी चा अभ्यास."

कुण्डाले एस. पीएच.डी,नागपुर विद्यापीठ1982

3) "a study of problems and difficulties of lanugage teaching at secoundary level."

Misra J.N phd. education.'

Dr. harishing gour vishwavidyalaya sagar,1968

➢ **रिसर्च पेपर**

Teaching hindi as a 'secound language' to non-hindi speaking children

Chandrika , mathur

Problems and prospects of hindi language search and text processing.

Aditya tripathi

A study of Learning Difficulties Faced By Non Hindi Speaking Students vii Studying In English Medium Schools In Vadodara City. By Mrs suvarna Jagtap

➢ **समस्या विधान**

औरंगाबाद शहरातील इयत्ता नवविच्या इंग्लिश माध्यमातिल विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लिहितां ना येणाऱ्या अडचणी चा अभ्यास करणे.

➢ **संशोधन परिकल्पना**

1) इयत्ता 9 वी च्या इंग्रजी माध्यमातिल हिंदी निबंध लेखनात अनेक वैशिष्ट्य पूर्ण बाबी आहेत.

2) इयत्ता 9 वीच्या इंग्रजी माध्यमातिल विद्यार्थ्यांना हिंदी निबंध लेखनात अनेक अडचणी येत असाव्यात.

➢ **संशोधनाचि उपायुक्तता**

इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचे भाषिक व लेखन कौशल्य विकास होण्यास मदत करने.

एखाद्या विषयाचा अभ्यास व आकलन समजून घेण्यास मदत होईल.

➢ **निष्कर्ष**

1) विद्यार्थ्यांना भाषेत गोंधळ दिसून आला.

2) इंग्रजी माध्यमच्या विद्यार्थ्यांना हिंदी विषया संबन्दी अडचणी दिसून आल्या.

3) हिंदी व इंग्रजी विषयात अनेक समस्या दिसून आल्या,हिंदीतिल व्यकर्णिक चुका जसे की मात्रा,वेलांटि द्यावी लागते म्हणून ते अवघड जाते परंतु इंग्रजी मधे असे काही नसल्याने ते सोपे असते हे दिसून आले.

➢ **संधर्भ विभाग**

कदम,चा. प.(1999), शैक्षणिक संख्या शास्र,(आ.2) पुणे: नूतन प्रकाशन

कुंडले, म.बा. ( 1962) अध्यापन शास्त्र पद्धति ( आ.2) पुणे:व्हीनस प्रकाशन.
दांडेकर.वा. ना.(1992) शैक्षणिक मूल्यमापन व सांख्यशास्त्र पूणे: नूतन प्रकाशन.
डब्लु डब्ल्यू डब्ल्यू .विकिपीडिया. कॉम